मुख्यमंत्री "माझी लाडकी बहीण" या योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने मार्गदर्शक सुचना.

**महाराष्ट्र शासन**
**महिला व बाल विकास विभाग,**
शासन परिपत्रक क्रमांक :- मबावि-२०२४/प्र.क्र.९६/भाग २/का-२
नविन प्रशासन भवन,तिसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक :१६ जूलै, २०२४.

वाचा- १) महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र.मबावि-२०२४/प्र.क्र.९६/का-२ दि.२८.६.२०२४
२) महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र.मबावि-२०२४/प्र.क्र.९६/का-२ दि.३.७.२०२४
३) महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र.मबावि-२०२४/प्र.क्र.१५६/का-२ दि.५.७.२०२४
४) महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र.मबावि-२०२४/प्र.क्र.९६/का-२ दि.१२.७.२०२४

परिपत्रक

राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी आणि त्यांच्या आरोग्य आणि पोषणात सुधारणा करण्यासाठी आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भुमिका मजबुत करण्यासाठी महाराष्ट्र राज्यात "मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण" योजना संदर्भ क्र. १ येथील दि. २८.६.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुरु करण्यात आली आहे. तदनंतर संदर्भाधीन क्र. २ ते ४ येथील शासन निर्णयान्वये सदर योजनेच्या अंमलबजावणी प्रक्रियेमध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या आहेत.

२. राज्यात सदर योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्याकरीता वरीलप्रमाणे झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यासाठी व या कार्यवाहीमध्ये एकसुत्रता राहण्याच्या अनुषंगाने मार्गदर्शक सुचना या शासन परिपत्रकासोबतच्या परिशिष्टानुसार निर्गमित करण्यात येत आहे. .

३. त्यानुसार आयुक्त, महिला व बाल विकास पुणे, सर्व महानगरपालिका आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी व सर्व मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी सदर मार्गदर्शक सुचना त्यांचे अधिनस्त संबंधित सर्व यंत्रणांच्या निदर्शनास आणाव्यात व त्यानुसार कार्यवाही करण्याबाबत सुचित करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(आनंद भोंडवे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष/सदस्य, विधानसभा/विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई,
५. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई,
६. मा.मंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
८. मा.मुख्यसचिव, मंत्रालय, मुंबई
९. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई,

१०. सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. विभागीय आयुक्त (सर्व).
१२. आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे.
१३. सर्व पोलीस आयुक्त,
१४.जिल्हाधिकारी (सर्व).
१५. सर्व जिल्हा पोलीस अधिकक्षक
१६. महालेखापाल - महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर.
१७. महालेखापाल - महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा), मुंबई / नागपूर.
१८. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१९ . सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
२०. सह सचिव, उपसचिव, अवर सचिव महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२१. सर्व सह आयुक्त/उप आयुक्त / विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे.
२२. सर्व विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास (आयुक्तालय पुणे मार्फत).
२३. सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी (आयुक्तालय पुणे मार्फत).
२४. महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई (सर्व कार्यासने).
२५. निवड नस्ती, कार्यासन-२

# अ) "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण" योजनेसाठी अर्ज भरण्याची कार्यपध्दती

१) सदर योजनेकरीता लाभार्थी महिलेस "नारी शक्ती दुत ॲप" द्वारे अर्ज भरता येईल. ज्या महिलेस ऑनलाईन अर्ज भरता येत नसेल त्यांना अंगणवाडी सेविका/ पर्यवेक्षिका/ मुख्य सेविका/ सेतू सुविधा केंद्र/ ग्रामसेवक/ समुह संसाधन व्यक्ती (CRP) / आशा सेविका/वार्ड अधिकारी/ CMM (City Mission Manager) / म.न.पा. बालवाडी सेविका/ मदत कक्ष प्रमुख/ आपले सरकार सेवा केंद्र यांच्याकडे अर्ज ऑनलाईन / ऑफलाईन भरण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. ऑनलाईन अर्ज भरण्याकरीता सर्व प्रथम गुगल प्ले स्टोअर वरून नारी शक्ती दूत मोबाईल ॲप डाऊनलोड (Download) करुन, Install करुन घेण्यात यावे. त्यानंतर ॲप मध्ये स्वतःची माहिती भरून लॉगिन आयडी तयार करुन घेण्यात यावे. (सदर सुविधा केवळ Android Mobile वर उपलब्ध आहे.)

२) सदर Login Id मधून सदर योजनेचा लाभ घेवू इच्छिणाऱ्या महिलेचा Online अर्ज दाखल करता येणार आहे.

३) या ॲपवरील मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण या योजनेवर क्लिक केल्यानंतर पात्र महिलांचा अर्ज भरण्याकरीता उपलब्ध होईल.

४) सदर योजनेकरीता अर्ज प्राधान्याने ऑनलाईन पध्दतीने भरण्यात यावेत. तथापि, ज्या महिलेस ऑनलाईन अर्ज भरता येत नसेल किंवा अर्ज भरताना तांत्रिक अडचण येत असेल तर, ऑफलाईन अर्ज भरण्याकरीता अर्जाचा नमुना व हमीपत्र याची PDF File उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्याची प्रिंट काढून त्याप्रमाणे अर्ज व हमीपत्र भरावे. तद्नंतर सदर ऑफलाईन अर्ज संबंधितांनी त्यांच्याकडे रजिस्टर मध्ये नोंद घेऊन त्यानंतर सदर अर्जाची माहिती व अनिवार्य कागदपत्रे, हमीपत्र याआधारे ऑनलाईन अर्ज टप्प्याटप्प्याने भरावे.

५) "मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" या योजनेकरीता अर्ज भरतांना खालील बाबी काळजीपूर्वक विचारात घेऊन माहिती भरावी.

I. **महिलेचे नाव, जन्मदिनांक, संपुर्ण पत्ता आधारकार्डप्रमाणे असावे.**

II. महिलेची विवाहित /अविवाहित /घटस्पोटीत/विधवा / परितक्त्या / निराधार महिला याची नोंद असावी.

III. महिलेचे आवश्यकतेप्रमाणे लग्नापुर्वीचे नाव व लग्नानंतरचे नाव नमूद केलेले असावे.

IV. "कुटुंब" याचा अर्थ पती, पत्नी व त्यांची अविवाहित मुले /मुले असा राहील.

V. सदर महिला महाराष्ट्र राज्याची रहिवासी असणे आवश्यक आहे. तसेच तिचे वय वर्ष २१ ते ६५ वर्ष या दरम्यान आहे याची खात्री करावी.

VI. महिलेचे जन्म प्रमाणपत्र/ महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र तथापि अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास त्याऐवजी महिलेचे (१) १५ वर्षापुर्वीचे रेशनकार्ड (२) १५ वर्षापुर्वीचे मतदार

ओळखपत्र (३) शाळा सोडल्याचा दाखला व (४) जन्म प्रमाणपत्र **या पैकी कोणतेही एक प्रमाणपत्र सादर करावे.**

VII. परराज्यात जन्म झालेल्या महिलेने महाराष्ट्रातील अधिवास असणाऱ्या पुरुषाबरोबर विवाह केला असेल तर अशा बाबतीत पतीचे (१) १५ वर्षापुर्वीचे रेशनकार्ड किंवा (२) १५ वर्षापुर्वीचे मतदार ओळखपत्र किंवा (३) जन्म प्रमाणपत्र किंवा (४) शाळा सोडल्याचा दाखला किंवा (५) अधिवास प्रमाणपत्र **यापैकी कोणतेही एक प्रमाणपत्र सादर करावे.**

VIII. नवविवाहित महिलेच्या बाबतीत तीचे नाव रेशनकार्डवर लगेच लावणे शक्य होत नाही. त्यामुळे विवाह नोंदणी प्रमाणपत्र असलेल्या अशा नवविवाहित महिलेच्या पतीचे रेशनकार्ड हे उत्पन्नाचा दाखल म्हाणून ग्राहय धरण्यात यावा.

६) अर्ज भरतांना मोबाईल क्रमांक व आधार क्रमांक अचूक नोंदविण्यात यावा. जेणेकरुन महिलेस अर्ज स्वीकृती व आर्थिक लाभाची रक्कम बँकेत जमा झाली असल्याची माहिती तसेच अन्य माहिती Mobile SMS द्वारे प्राप्त होऊ शकेल.

७) सदर योजनेचा लाभ घेवू इच्छिणाऱ्या महिलेने शासनाच्या इतर विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या आर्थिक योजनेचा लाभ घेत आहे किंवा नाही याबाबत माहिती भरलेली असावी. तसेच आर्थिक लाभ घेत असल्यास तर तिला दरमहा किती लाभ मिळतो ती रक्कम नमूद करण्यात यावी. ऑफलाईन अर्जाच्या बाबतीत संबंधितांनी सदर माहिती भरल्याची खातरजमा करावी. जर आर्थिक लाभाची रक्कम दरमहा रुपये १५००/- किंवा त्यापेक्षा अधिक असल्यास महिलेस या योजनेंतर्गत आर्थिक लाभ मिळणार नाही.

८) महिलेच्या बँकेच्या तपशीलात बँकेचे पूर्ण नाव, खाते धारकाचे नाव , बँक खाते क्रमांक, IFSC कोड अचूक नोंदविण्यात यावा. सदर बँक खाते आधार संलग्न (लिंक) केलेले आहे किंवा कसे, याची माहिती / नोंद घेण्यात यावी. तसेच बँक खाते आधार संलग्न नसल्यास ते तात्काळ सलग्न करुन घेण्यात यावे. आधार संलग्न असल्यास लाभ अदा करण्याची प्रक्रिया सुलभ होईल.

९) सदर योजनेचा लाभ घेण्याकरीता पोस्टातील बँक खाते ग्राहय धरण्यात यावे.

१०) योजनेच्या नमुना अर्जातील अनुक्रमांक १२ येथे महिलेचा अर्ज भरून देण्यास मदत करणारी अधिकृत व्यक्ती कोण आहे याची अचूक नोंद करण्यात यावी. अंगणवाडी सेविका/ पर्यवेक्षिका/ मुख्य सेविका/ सेतू सुविधा केंद्र/ ग्रामसेवक/ समुह संसाधन व्यक्ती (CRP) (MAVIM, MSRLM, NULM) / आशा सेविका/वार्ड अधिकारी/ CMM (City Mission Manager) / म.न.पा. बालवाडी सेविका/ मदत कक्ष प्रमुख/ आपले सरकार सेवा केंद्र.

११) केंद्र शासनाने विविध शासकीय योजनांचे लाभ PFMS-DBT प्रणालीद्वारे देण्याची प्रक्रिया कार्यान्वित केली आहे. केंद्र / राज्य शासनाच्या विविध योजनांमधील (उदा.PM-KISAN, POSHAN,MGNREGS, PM-Svanidhi, JSY,PMMVY व अन्य तत्सम योजना) जे लाभार्थी "मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" या योजनेच्या अटी शर्तीनुसार पात्र ठरत असतील, त्यांचा DATA माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून प्राप्त झाल्यानंतर त्यांचे KYC व Aadhaar AUtehentication यापुर्वीचे झालेले असल्याने सदर लाभार्थ्यांना

केवळ ऑफलाईन अर्ज भरुन घेऊन "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण" या योजनेत त्यांचे नाव नोंदविण्यात यावे.

१२) गावपातळीवर ग्रामसेवक, कृषि सहायक, तलाठी, अंगणवाडी सेविकास, आशा सेविका, ग्राम रोजगार सेवक व अन्य ग्रामस्तरीय कर्मचारी यांनी "ग्रामस्तरीय समिती" स्थापन करण्यात यावी. सदर समितीचे संयोजक ग्रामसेवक व सदस्य सचिव अंगणवाडी सेविका राहतील. समितीने सदर योजनेसाठी गावपातळीवर शिबिर आयोजित करुन त्यामध्ये ऑनलाईन तसेच ऑफलाईन या दोन्ही पध्दतीने लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात यावी. ऑफलाईन अर्ज यथावकाश ॲप /पोर्टलवर भरण्यात यावेत.

१३) ग्रामस्तरीय समितीमार्फत  लाभार्थी महिलांच्या यादीचे प्रत्येक शनिवारी व आवश्यकतेनुसार गाव चावडीवर वाचन करण्यात यावे. तसेच सदर यादी ग्रामपंचायत व अंगणवाडी केंद्र येथे प्रसिध्द करण्यात यावी. सदर प्रसिध्द करण्यात आलेल्या यादीवर हरकती प्राप्त झाल्यास त्यांचे निराकरण करण्यात यावे. तसेच द्विरुक्ती (Duplication) टाळण्यात यावी.

१४) अर्जासोबत जोडावयाची / अपलोड करावयाची कागदपत्रे

सदर अर्ज भरल्यानंतर खालील कागदपत्रे अपलोड करणे अनिवार्य आहे.

I. आधार कार्डची प्रत (दोन्ही बाजूने)

IX. महिलेचे जन्म प्रमाणपत्र/ महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र तथापि अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास त्याऐवजी महिलेने (१) १५ वर्षापुर्वीचे रेशनकार्ड (२) १५ वर्षापुर्वीचे मतदार ओळखपत्र (३) शाळा सोडल्याचा दाखला व (४) जन्म प्रमाणपत्र **या पैकी कोणतेही एक प्रमाणपत्र सादर करावे.** तथापि, परराज्यात जन्म झालेल्या महिलेने महाराष्ट्रातील अधिवास असणाऱ्या पुरुषाबरोबर विवाह केला असेल तर अशा बाबतीत पतीचे (१) १५ वर्षापुर्वीचे रेशनकार्ड किंवा (२) १५ वर्षापुर्वीचे मतदार ओळखपत्र किंवा (३) जन्म प्रमाणपत्र किंवा (४) शाळा सोडल्याचा दाखला किंवा (५) अधिवास प्रमाणपत्र **यापैकी कोणतेही एक प्रमाणपत्र सादर करावे.**

II. कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.२.५० लाखापेक्षा कमी असणे आवश्यक

अ) पिवळी अथवा केशरी शिधापत्रिका असल्यास उत्पन्न प्रमाणपत्राची आवश्यकता नाही. शिधापत्रिकेच्या पहिल्या व शेवटच्या पानाची प्रत जोडावी.

ब) शुभ्र शिधापत्रिका असल्यास अथवा कोणतीही शिधापत्रिका नसल्यास वार्षिक उत्पन्न रु. २.५० लाखापर्यंत असल्याचे प्रमाणपत्र .

III. अर्जदाराचे हमीपत्र (हमीपत्राचा नमुना पीडीएफ (PDF) स्वरुपात फाईल अर्जात उपलब्ध करुन दिलेला आहे. तो डाउनलोड करुन भरावा व स्वाक्षरी करावी, व तदनंतर अपलोड करण्यात यावा).

IV. बँकेच्या पासबुकची पहिल्या पानाची प्रत अनिवार्य नाही तथापि असल्यास अपलोड करावी.

V. अर्जदाराचा फोटो (ऑफलाईन अर्जादरील लाभार्थी महिलेच्या फोटोचा फोटो काढून तो ऑनलाईन अर्ज दाखल करण्यासाठी ग्राहय धरण्यात यावे.)

१५) अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्याबाबतचा सदर महिलेच्या मोबाईल SMS द्वारे मेसेज जाईल. सदर मेसेज अर्ज भरल्याची पोच पावती आहे.

१६) महिलांना उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला, अधिवास प्रमाणपत्र, जन्म दाखला इ. कागदपत्रे प्राप्त होण्यासाठी सर्वोतोपरी मदत करण्यात यावी.

१७) अर्ज भरण्याची प्रक्रिया विनामूल्य असल्याने कोणत्याही महिलेकडून यासाठी पैसे अथवा फी घेण्यात येऊ नये अथवा स्विकारण्यात येऊ नये.

## ब) अर्ज भरल्यानंतरची छाननी व अंतिम निर्णय घेण्याबाबतची कार्यपध्दती

सर्व महानगरपालिका क्षेत्रात वार्ड स्तरीय / तालुकास्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. सदर तालुकास्तरीय / वॉर्डस्तरीय समितीमध्ये ३ अशासकीय सदस्य असतील. त्यामधील एक अध्यक्ष राहतील. सदर समितीच्या अध्यक्षांची व इतर २ अशासकीय सदस्याची निवड सदर जिल्हयांच्या पालकमंत्री यांच्यामार्फत करण्यात येईल.

सदर समितीने त्यांच्या क्षेत्रातील अर्जासंदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करावयाची आहे:-

१) अंगणवाडी सेविका/मुख्य सेविका/सेतू सुविधा केंद्र/ग्रामसेवक/वार्ड अधिकारी इ. मार्फत मोबाईल ॲप / पोर्टलद्वारे प्राप्त झालेल्या लाभार्थ्यांची त्यांच्या क्षेत्राची माहिती संकलित करावी

२) तालुका / वार्ड स्तरीय समितीची छाननी बैठक सातत्याने आयोजित करण्यात यावी.

३) तसेच प्राप्त झालेल्या अर्जाची व त्यासोबत अपलोड केलेल्या कागदपत्रांची खातरजमा करुन पात्र / अपात्रतेची तात्पुरती यादी तयार करण्यात यावी. तालुकानिहाय यादी सदस्य सचिव यांनी डाऊनलोड करुन गाव / वार्डनिहाय त्या-त्या ठिकाणी लावावी. सदर यादी गाव/ वॉर्ड /अंगणवाडी केंद्र या ठिकाणी प्रसिध्द करण्याकरीता संबंधितांकडे पाठविण्यात यावी. त्यानुसार या ठिकाणी सदर यादी प्रसिध्द करण्यात यावी.

४) तालुका / वॉर्ड स्तरीय समितीने तात्पुरत्या यादीनुसार अपात्र केलेल्या अर्जदारास अपात्रतेच्या कारणाबाबतचा मेसेज त्याच्या मोबाईलवर पाठविण्यात येईल. त्यानुसार ज्या लॉगिन वरुन अर्ज दाखल केला होता, त्यावरुन त्रुटी पुर्तता १ वेळ (One Time) करता येईल. तसेच या यादीबाबत आक्षेप असल्यास आक्षेप घेणाऱ्याने आक्षेपाच्या अनुषंगाने आवश्यक ती कागदपत्रे तात्काळ जमा करावी.

५) प्राप्त झालेले आक्षेप व त्यासंबंधिची कागदपत्रे याची नोंद घेऊन सदरचे आक्षेप व कागदपत्रे लवकरात लवकर तालुका / वॉर्ड स्तरीय समितीकडे सादर करावेत.

६) तालुका / वार्ड स्तरीय समितीने बैठक घेऊन अंतिम पात्र लाभार्थ्यांची यादी प्रसिध्द करावी. त्यानुसार योजनेच्या लाभाकरीता पात्र / अपात्र झाल्याबाबतचा मेसेज अर्जदाराच्या मोबाईल क्रमांकावर जाईल.

## क) अंतिम पात्र लाभार्थी यादीनुसार करावयाची कार्यवाही:-

जिल्हास्तरावर संबंधित जिल्हयाचे पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीने खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१) जिल्हास्तरीय समितीने तालुकास्तरीय समितीवर देखरेख व संनियंत्रण ठेवावे. सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीकरीता जिल्हा स्तरीय समितीने वेळोवेळी आढावा घेऊन त्यांचे अधिनस्त तालुका / वार्ड स्तरीय समितींना व कार्यरत यंत्रणांना आवश्यक ते मार्गदर्शन करावे.

२) जिल्हास्तरीय समितीची आठवडयातून दोनदा अथवा आवश्यकतेनुसार वेळोवेळी बैठक आयोजित करण्यात यावी.

३) कोणतीही पात्र लाभार्थी महिला योजनेचा लाभ घेण्यापासून वंचित राहणार नाही याबाबतची दक्षता घेण्यात यावी.

## ड) लाभार्थ्यांना लाभ मंजूर करण्याची कार्यपध्दती

१) तालुका / वार्डस्तरीय समित्यांनी अंतिम केलेल्या लाभार्थी यादीनुसार संबंधित जिल्हास्तरीय समितीने लाभार्थ्यांना लाभ अदा करण्याकरीता आवश्यक असलेला निधी याबाबतचा प्रस्ताव जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेमार्फत आयुक्त, महिला व बाल विकास पुणे यांच्याकडे सादर करावा.

२) आयुक्त, महिला व बाल विकास पुणे यांचे स्तरावरील राज्यस्तरीय समितीने संबंधित सर्व जिल्हयांकडून प्राप्त झालेले प्रस्ताव व ॲप / पोर्टलवरील तपशिल याबाबतची तपासणी करुन त्यानुसार राज्यातील पात्र लाभार्थ्यांना लाभ अदा करण्याबाबतचा आवश्यक असलेल्या निधीचा प्रस्ताव प्रस्ताव शासनास सादर करावा. तद्नंतर डी.बी.टी द्वारे लाभार्थ्यांना लाभ मंजूर करण्याबाबत उचित कार्यवाही करण्यात येईल.

## ई) इतर कार्यवाही

१) सदर योजनेची अंमलबजावणीकरीता जिल्हास्तरीय समितीने तसेच राज्यस्तरीय समितीतने नियमित आढावा घेऊन आवश्यक त्या उपाययोजना करण्यात याव्यात.

२) जिल्हास्तरीय समितीने जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी व जिल्हा माहिती अधिकारी यांच्यामार्फत सदर योजनेची प्रचार व प्रसिद्धी करण्यात यावी.

३) जिल्हास्तरीय समितीने जिल्हयातील सर्व प्रांत अधिकारी, तहसिलदार व इतर अधिकाऱ्यांना तसेच सेतू सुविधा केंद्र यांना लाभार्थी महिलांना उत्पन्नाचा दाखला, अधिवास प्रमाणपत्र, रेशनकार्ड, इ. तात्काळ उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सुचना देण्यात

याव्यात. ज्या महिलांकडे आधार कार्ड नसल्यास अशा महिलांचे आधारकार्ड काढण्याकरीता कॅम्प आयोजित करण्याच्या सुचना संबंधितांना देण्यात याव्यात.

४) जिल्हास्तरीय समितीने जिल्ह्यातील विविध बँकाना पात्र लाभार्थी महिलांचे बँक खाते नसल्यास Zero Balance खाते उघडून आधारकार्ड संलग्न करुन घेणे तसेच लाभाची रक्कम थेट लाभार्थीच्या बँक खात्यात जमा होण्याच्या अनुषंगाने आवश्यक त्या सूचना द्याव्यात.

५) जिल्हयातील ज्या महिला शासनाच्या अन्य योजनेमध्ये रु. १५००/- अथवा त्यापेक्षा अधिक लाभ घेत असल्यास त्याबाबतची माहिती जिल्हयातील बँकांकडून प्राप्त करुन घ्यावी.

६) महिला व बाल विकास आयुक्तालय पुणे येथे लाडकी बहीण कक्ष तयार करण्यात यावा. त्यामध्ये तांत्रिक मनुष्यबळाचा देखील समावेश असावा. तसेच सदर योजनेकरीता कॉल सेंटर कार्यान्वित करावे. तसेच सदर योजने च्या अंमलबजावणी मध्ये येणाऱ्या अडीअडचणीचे तात्काळ निराकरण करण्यात यावे तसेच या योजनेत धोरणात्मक बदल करणे आवश्यक असल्यास त्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करावा.

(आनंद भोंडवे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन